खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## मराठी विभाग : वाचन प्रेरणा दिन

राष्ट्रसंचार

» Selected



### राजगुरू महाविद्यालयात वाचन प्रेरणादिन उत्साहात

**राजगुरूनगर :** वाचनामुळे बुद्धीचा, अनुभवाचा आवाका वाढतो. ज्ञान व माहिती मिळते. वैचारिकता, संवेदनशिलता, भाषासमृद्धी, कल्पना शक्तीचा विकास होतो. म्हणून समृद्ध जीवन जगायचे असेल तर वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. अनिल कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक अवांतर वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. गायत्री कौदरे या विद्यार्थिनीचे डॉ. कलाम यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाने विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन मे है विश्वास' या पुस्तकाचे अभिवाचन, काव्यवाचन, चर्चासत्र आदी उपक्रमांचे आयोजन केले. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे आणि आभार प्रा. रौनक भिसे यांनी मानले.

पुण्य नगरी

# समृद्ध जीवनासाठी वाचन आवश्यक : प्रा. कुलकर्णी



। राजगुरूनगर : वाचनामुळे बुद्धीचा, अनुभवाचा आवाका वाढतो. ज्ञान व माहिती मिळते. वैचारिकता, संवेदनशीलता, भाषासमृद्धी, कल्पनाशक्तीचा विकास होतो. म्हणून समृद्ध जीवन जगायचे असेल तर वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. अनिल कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील उपस्थित होते.

प्रा. अनिल कुलकर्णी पुढे म्हणाले, वाचनामुळे मूल्यविचार रूजतो. आपण अंतर्मुख होतो. आपल्या जाणीवा प्रकल्प होतात. संवेदनशीलता जपता येते. विद्यार्थ्यांनी कथा-कवितेच्या माध्यमातून व्यक्त व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक अवांतर वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. गायत्री कौदरे या विद्यार्थिनीचे डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाने विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन मे है विश्वास' या पुस्तकाचे अभिवाचन, काव्यवाचन, चर्चासत्र आदी उपक्रमांचे आयोजन केले. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रणव तिमुणे, वैष्णवी शिंदे, प्रिया भालसिंगे, सानिका सुकाळे, अस्मिता शिंदे, तेजस्विनी सोनवणे या विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभागी घेतला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे तर आभार प्रा. रौनक भिसे यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Oct 16, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com



वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी मान्यवर व विद्यार्थी.

## समृद्ध जीवनासाठी वाचन आवश्यक : प्रा. कुलकर्णी

**राजगुरुनगर** : वाचनामुळे बुद्धीचा, अनुभवाचा आवाका वाढतो. ज्ञान व माहिती मिळते. वैचारिकता, संवेदनशीलता, भाषासमृद्धी, कल्पनाशक्तीचा विकास होतो. म्हणून समृद्ध जीवन जगायचे असेल, तर वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. अनिल कुलकर्णी यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक अवांतर वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. गायत्री कौदरे या विद्यार्थिनीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्राची माहिती दिली. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाने विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन में है विश्वास' या पुस्तकाचे अभिवाचन, काव्यवाचन, चर्चासत्र आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रणव तिमुणे, वैष्णवी शिंदे, प्रिया भालसिंगे, सानिका सुकाळे, अस्मिता शिंदे, तेजस्विनी सोनवणे या विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांना केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांना केले. प्रा. रौनक भिसे यांनी आभार मानले.

## निंबुत येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**सोमेश्वरनगर** : निंबुत (ता. बारामती) येथील बाबालाल साहेबराव काकडे विद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी ( दि. १५) वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने विद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले, तसेच सहकार महर्षी कै. बाबालाल काकडे यांची जयंती साजरी करण्यात आली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख